**Time : 2½ Hours** **MARATHI LANGUAGE II**

**Subject Code**

| H | 4 | 2 | 3 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 8** **(Printed Pages : 6)** **Maximum Marks : 80**

***सूचना :*** (*i*) प्रत्येक मुख्य प्रश्नाचे उत्तर नव्या पानावर लिहा.

(*ii*) प्रश्नांचे क्रमांक स्पष्ट लिहा.

(*iii*) उजव्या बाजूचे अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

1. (अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 6

(1) ''चला चालते व्हा इथनं! एकच भाकरी आहे माझ्या घरात. माझ्या पोरांना हवी ती!''

(2) ''वाटेल ते होऊ दे. पण त्याचे डोळे जिवंत राहायलाच हवेत.''

(3) ''श्यामला खर्वस पाठविला असता, कोणी येणारे जाणारे असते तर!''

(ब) खालीलपैकी कोणत्याही **एका**चे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 6

(1) गुरुरावस्वामी असे स्वयंप्रकाश

ज्यापुढें उदास चंद्र रवी.

(2) गोरटे की सावळे या मोल नाही फारसे.

(3) शाप देत बसायचं की दुवा देत हसायचं ? तुम्हीच ठरवा.

2. (अ) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे **3** ते **4** ओळींत लिहा : 6

(1) यत्नदेवाच्या पूजेसाठी विद्यार्थीदशेचा काळ अधिक योग्य आहे असे लेखक द. वा. पोतदार का म्हणतात ?

(2) शिकारचोर गेंडयांची शिकार कशी करतात ?

(3) लेखक मधु मंगेश कर्णिक बालपणी गांधीजींचे चित्र कसे रेखाटायचे ?

(ब) खालील कवितेच्या ओळी कंसातील योग्य शब्द वापरून पूर्ण करा : 4

(1) ...................... संगतीने समज। ध्यानि आणुनि पुरतें उमज।

(पंतांच्या, संतांच्या, साधूंच्या)

(2) त्यात ...................... वीर देती जीवितांच्या आहुती.

(शेकडो, हजारो, लाखो)

(3) फाटकी ही झोपड़ी ...................... माझे.

(काळीज, हृदय, मन)

(4) ...................... इतरांच्या हृदयातून उभ्या पिकासारखं वाऱ्यावर डुलावं.

(झुलावं, फुलावं, हलावं)

3. (अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर प्रत्येकी **7** ते **8** ओळींत लिहा : 5

(1) पंतांच्या कुटुंबियांवर ओढवलेल्या प्रसंगाचे वर्णन लेखक दिवाकरांनी कसे केले आहे ?

(2) 'मांजर व्हा' या पाठात विनाकारण लाथ मारणाऱ्या केळकरीण बाईला मांजर झालेल्या लेखकाने कसा धडा शिकविला ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर प्रत्येकी **7** ते **8** ओळींत लिहा : 5

(1) 'चक्रवाक पक्षी' या अभंगात संत नामदेवांनी आपल्या मनाची अवस्था कोणकोणत्या उदाहरणांतून स्पष्ट केली आहे ?

(2) ग्रामीण मुलीची शिक्षण घेण्याची तळमळ 'माये ग माये' या कवितेतून कशी दिसून येते ?

4\. (अ) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा : 4

(अ) कर्णाच्यासमोर उभे राहण्याचं सामर्थ्य पार्थाशिवाय दुसऱ्या कोणत्याही वीरामध्ये नाही.

(आ) तो हसला आणि त्यानं मला जायला सांगितलं.

(आ) खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा : 3

(अ) गरीब

(आ) लहान

(इ) कृतज्ञ

(इ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 3

(अ) आधार

(आ) जीवन

(इ) पराजय

(ई) खालील शब्दांची विशेषणे लिहा : 2

(अ) माया

(आ) समाज

(उ) खालील शब्दांचे वचन बदला : 2

(अ) नद्या

(आ) मशाल

(ऊ) खालील शब्दांचे लिंग बदला : 2

(अ) हत्ती

(आ) तरूणी

(ए) 'प' गटातील वाक्प्रचार आणि 'फ' गटातील वाक्प्रचारांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : 4

| **'प'** | **'फ'** |
|---|---|
| (अ) बार टाकणे | — मोठ्याने हसणे |
| (आ) नाकाने कांदे सोलणे | — फसवणे |
| (इ) हलकल्लोळ माजणे | — गोळी घालणे |
| (ई) प्रतारणा करणे | — आरडाओरडा होणे |
| | — जबाबदारी स्वीकारणे |
| | — शिष्टपणा दाखविणे |

5. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा :

व्यक्तीमध्ये इष्ट दिशेने परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया म्हणजे 'शिक्षण' होय. स्वामी विवेकानंदानी म्हटले आहे की शिक्षण म्हणजे डोक्यात कोंबले जाणारे, गोंधळ उडवून देणारे व न पचणारे ज्ञान

नव्हे, तर शिक्षणामुळे कल्पना आत्मसात होऊन जीवनाला दिशा मिळाली पाहिजे, त्यातून चारित्र्य निर्माण झाले पाहिजे. डॉ. राधाकृष्णन यांच्या मते—केवळ बौद्धिक भरारी म्हणजे शिक्षण नव्हे तर विविध प्रवृत्ती व भावना यांना योग्य असे सुसंस्कृत वळण लावणे म्हणजे 'शिक्षण'! शिक्षणातून केवळ साक्षरता निर्माण करावयाची नसून सुंदर माणूस निर्माण व्हायला हवा मनुष्याची बुद्धी, हृदय व आत्मा यांचा विकास म्हणजे शिक्षण. व्यापक अर्थाने आपण आयुष्यभर शिकतच असतो. आयुष्याच्या शिक्षणात पाटी, पेन्सिल किंवा पुस्तके नसतात. व्यवहारिक जीवनात आपण ज्या घटनांना सामोरे जातो, जे अनुभव घेतो त्यातून आपण शिकतो. किती पाठ केले यापेक्षा किती लक्षात ठेवले यावर विद्वतेचे मोजमाप ठरत असते. विधायक व सर्जनशील व्यक्तिमत्वाची निर्मिती शिक्षणातून घडावी अशी अपेक्षा असते. शिक्षणाचा गाभा नीतिमूल्ये आहेत, तेव्हा शिक्षणात मूल्यांवर भर दिला पाहिजे.

—डॉ. क्षमा लिमये

प्रश्न :

(1) स्वामी विवेकानंदांच्या मते शिक्षण म्हणजे काय ? 1

(2) डॉ. राधाकृष्णन यांनी शिक्षणाविषयी कोणते विचार मांडले आहेत ? 1

(3) विद्वतेचे मोजमाप कसे ठरत असते ? 1

(4) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. 1

6. (अ) 'सरदार वल्लभभाई पटेल उच्च माध्यमिक विद्यालय', मडगाव येथे पार पडलेल्या बक्षीस वितरण सोहळ्याचा वृत्तान्त **8** ते **10** ओळींत लिहा. 5

(ब) पणजी येथील 'संत ज्ञानेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाने आयोजित केलेल्या प्रजासत्ताक दिनाच्या (26 जानेवारी) सोहळ्याची कार्यक्रमपत्रिका तयार करा. 4

7. ‘विद्यार्थ्यांच्या आत्महत्या’ या विषयावर दोन मित्र/मैत्रिणीं मधील संवाद सुमारे **10** ते **12** ओळींत लिहा. 5

8. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **वीस** ओळींत निबंध लिहा : 10

(1) बस स्थानकावरील एक तास

(2) माझा आवडता कवी/कवयित्री

(3) समुद्र आटला तर..........

(4) वृद्धाश्रमातील आजीचे आत्मवृत्त

(5) रस्त्यावरील वाढते अपघात—एक समस्या